नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३० Issue - 230 | वार शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६ Blow- Friday Date 9 January 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# देशातील पहिल्या 'डिजिटल जनगणने'ला एक एप्रिलपासून सुरुवात

## १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ या काळात देशभरात होणार जनगणना




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नवी दिल्ली : भारत सरकार २०२७ मध्ये जनगणना करणार आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा, म्हणजेच घरांची यादी बनवण्याचे काम, १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ या काळात देशभरात होईल. या कामासाठी १५ दिवसांचा सेल्फ-डिक्लेरेशनचा पर्यायही असेल. प्रत्यक्ष जनगणना फेब्रुवारी २०२७ मध्ये सुरू होईल.

गृह मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, प्रत्येक राज्य/केंद्रशासित प्रदेशाने अधिसूचित केलेल्या वेळापत्रकानुसार, घरोघरी जाऊन केल्या जाणाऱ्या गणनेच्या १५ दिवस आधीपासून स्वयं-गणनेची सुविधा उपलब्ध असेल. ही देशातील पहिली डिजिटल जनगणना असेल, ज्यामध्ये अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही आवृत्त्यांसाठी उपलब्ध असलेल्या मोबाईल प्लिकेशन्सचा वापर करून डेटा गोळा केला जाईल. जनगणना कार्याचे संकलन, देखरेख आणि पर्यवेक्षणासाठी सुमारे ३० लाख क्षेत्रीय कर्मचारी, ज्यात प्रगणक, पर्यवेक्षक, मास्टर ट्रेनर, प्रभारी अधिकारी आणि प्रधान किंवा जिल्हा जनगणना अधिकाऱ्यांचा समावेश आहे, तैनात केले जातील.

जनगणना दोन टप्प्यांत घेतली जाईल. पहिला टप्पा घरगणना आणि गृहनिर्माण जनगणनेचा असेल - जो एप्रिल ते सप्टेंबर २०२६ दरम्यान होईल, तर दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्या गणनेचा (पीई) असेल. लडाख केंद्रशासित प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशातील तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांमधील बर्फाच्छादित गैर-समकालिक भागांसाठी, लोकसंख्या गणना या वर्षी सप्टेंबरमध्ये केली जाईल.

# मुंबईसह २९ ठिकाणी १५ जानेवारीला सुट्टी जाहीर; शासनाची अधिसूचना जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून बडे नेते प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. दुसरीकडे कार्यकर्ते आणि नागरिकांनाही प्रचारसंभांची उत्सुकता लागली आहे. त्याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोग आणि प्रशासनाकडूनही तयारी सुरू आहे. निवडणूक आयोगाकडून ईव्हीएमसह प्रशासकीय तयारीही जवळपास पूर्ण झाली आहे. तर, राज्य सरकारनेही १५ जानेवारी मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे. मुंबईसह राज्यातील २९ महापालिका क्षेत्रात मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्यात आली आहे. त्यामुळे, कामगार, कर्मचारी आणि शासकीय व निमशासकीय ठिकाणी काम करणाऱ्यांना मतदानादिवशी सुट्टी असून मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलंय.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील, पण कामानिमित्त मतदारसंघाबाहेर असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.दरम्यान, मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# दोन वाहनांची समोरासमोर भीषण धडक; चौघे जागेवरच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नाशिक: नाशिक जिल्ह्यातील आंबेगन शिवाराजवळ राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी सकाळी दोन वाहनांची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर सहा ते सात प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अशी माहिती पोलीसांकडुन समोर आली आहे. अपघातात नाशिकहून पेठकडे जात असलेली कार आणि विरुद्ध दिशेने येणारी दुसरी कार धडकली. धडक इतकी जोराची होती की दोन्ही वाहनांचे अवशेष चक्काचूर झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात घेऊन जाण्यात आले आहेत.

जखमींवर नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींमध्ये चार महिलांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टर्सनी सांगितले आहे. माहिती नुसार, प्रवासी शिर्डी येथे साईंचे दर्शन घेऊन नाशिकमार्गे गुजरातमधील वापीकडे जात असताना चाचडगाव टोलनाका पार केल्यानंतर अपघात झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून स्थानिक नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.हे अपघात दोन दिवसांपूर्वी घडलेल्या भीषण अपघातासारखेच आहे. राहुरी ते शनिशिंगणापूर रस्त्यावर उंबेरे गावाजवळ रिक्षा आणि मिनीबसची समोरासमोर धडक झाली होती, ज्यात इगतपुरी-जवळील गिरणारे येथील तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला आणि दोन गंभीर जखमी झाले.

विशेष म्हणजे या अपघातात मृतकांमध्ये दीपक जगन डावखर (वय २२), आकाश मनोहर डावखर (वय २२), दीपक विजय जाधव (वय २२) यांचा समावेश आहे. जखमींमध्ये रुपेश गणेश भगत (वय १९) आणि रोशन गंगाधर डावखर यांचा समावेश आहे.

प्रशासनाने अपघाताच्या कारणाची चौकशी सुरू केली असून, महामार्गावर वाहनांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अधिक सतर्कता घेण्याचे आवाहन केले आहे.

# अंबरनाथ मध्ये काँग्रेसला धक्का १२ नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अंबरनाथ : अंबरनाथ नगर परिषदेतील काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी आज नवी मुंबई येथे भाजप मध्ये प्रवेश केला. महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, संजीव नाईक ,दीपेश म्हात्रे आदी मान्यवरांच्या उपस्तीथत हा प्रवेश झाला. एकाच वेळी काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी पक्षांतर केल्यामुळे अंबरनाथमध्ये भाजपाची राजकीय स्थिती अतिशय मजबूत झाली आहे.

काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश करणाय़ा नगरसेवकांची यादी

१)प्रदीप नाना पाटील २) दर्शना उमेश पाटील ३) अर्चना चरण पाटील ४) हर्षदा पंकज पाटील ५) तेजस्विनी मिलिंद पाटील ६) विपुल प्रदीप पाटील ७) मनीष म्हात्रे ८) धनलक्ष्मी जयशंकर ९) संजवणी राहुल देवडे १०) दिनेश गायकवाड ११) किरण बद्रीनाथ राठोड १२) कबीर नरेश गायकवाड

काँग्रेसच्या या १२ नगरसेवकांच्या भाजप प्रवेशामुळे अंबरनाथमधील राजकारणाची दिशा बदलणार आहे. ज्या नगरसेवकांनी विरोधात निवडणूक लढवली, तेच आता भाजपच्या झेंड्याखाली येणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतलेल्या या भूमिकेनंतर आता स्थानिक पातळीवर काँग्रेसची ताकद किती उरणार आणि भाजपला या नगरसेवकांच्या प्रवेशाने किती फायदा होणार, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

# मुंबईत कुर्ला स्टेशनदरम्यान लोकल ट्रेनला भीषण आग, डब्बा जळून खाक; रेल्वे वाहतूक विस्कळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबईतील जनसामान्यांची जीवनवाहिनी म्हणून मुंबई लोकलकडे पाहिले जाते, लक्षावधी प्रवासी दररोज मुंबई लोकलमधून प्रवास करतात. त्यामुळे, लोकलच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न असतो.

लोकल सेवा सुरळीत आणि वेळेवर चालवण्यासाठी रेल्वे प्रशासन प्रयत्नशील असते, विशेष म्हणजे अपघात रोखण्यासाठीही प्रशासनाने प्रयत्न असतात.

लोकल ट्रेनमधून पडल्याने अनेक अपघात होतात, त्यामुळे रेल्वे पोलीस आणि रेल्वे प्रशासन, प्रवासी अपघात टाळण्यासाठी प्रयत्नशील असतात. मात्र, तरीही काही घटना घडतात. कुर्ला आणि विद्याविहार स्टेशन दरम्यान आज ट्रॅकवर उभा असलेल्या लोकलला आग लागल्याची घटना घडली. त्यामुळे मध्य रेल्वेची सीएसएमटीकडे जाणारी रेल्वे वाहतूक काही काळासाठी बंद करावी लागली होती.मध्य रेल्वेच्या स्लो मार्गावरील वाहतूक ठप्प होती, कुर्ला स्टेशनच्या पुढे काही वेळेसाठी बंद करण्यात आली होती. रेल्वे प्रशासनाने तात्काळ लोकल ट्रेनला लागलेली आग आटोकण्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

आता तब्बल अर्ध्या तासाने आग विझवण्यात आली आहे, त्यामुळे या मार्गावरील लोकल वाहतूक पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न रेल्वे प्रशासनाकडून सुरू होते.

दरम्यान, या लोकलमध्ये केवळ कचरा असल्याने सुदैवाने कुठलीही जिवीतहानी झाली नाही, मात्र आग भडकल्याने ट्रेनचा एक डब्बा जळून खाक झाला आहे.

## रशियन मालमत्ता जप्त करणे, हे जागतिक शांततेसाठी धोकादायक


## संरक्षण बजेटमध्ये ऐतिहासिक वाढ आणि भारतावर दबाव

# ट्रम्पचा रशियाविरोधी कृत्यांमुळे तिसऱ्या महायुद्धाचा धोका वाढला!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत येताना युक्रेन युद्ध थांबवण्याचे आणि जगात शांतता प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, नवीन वर्ष सुरू होताच ट्रम्प प्रशासनाची पावले शांततेऐवजी जागतिक संघर्षाला खतपाणी घालणारी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे. एकीकडे युक्रेनमधील युद्ध अद्याप सुरू असताना आणि मध्य पूर्वेतील तणाव कायम असतानाच, आता अमेरिका आणि रशियामध्ये थेट संघर्षाची ठिणगी पडली आहे. उत्तर अटलांटिक महासागरात अमेरिकेने रशियाचा तेल टँकर जप्त केल्याने तिसऱ्या महायुद्धाच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

अमेरिकन तटरक्षक दल आणि लष्कराने एका संयुक्त मोहिमेअंतर्गत उत्तर अटलांटिक महासागरातून 'मरीनेरा' या रशियन ध्वजांकित तेल टँकरला ताब्यात घेतले आहे. अमेरिकेच्या दाव्यानुसार, हा टँकर आंतरराष्ट्रीय निर्बंधांचे उल्लंघन करून व्हेनेझुएलाच्या तेलाची बेकायदेशीर वाहतूक करत होता. विशेष म्हणजे, या टँकरचे पूर्वीचे नाव 'बेला-१' असे होते आणि २०२४ मध्येच अमेरिकेने यावर निर्बंध लादले होते. कारवाई टाळण्यासाठी टँकरचे नाव बदलून तो पुन्हा सक्रिय करण्यात आला होता, मात्र अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनी तो शोधून काढला. जागतिक तणावात भर ट्रम्प यांच्या या आक्रमक कारवाईमुळे रशिया संतप्त होण्याची शक्यता असून, यामुळे दोन्ही अण्वस्त्रधारी देशांमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने थेट रशियन मालमत्ता जप्त करणे, हे जागतिक शांततेसाठी धोकादायक मानले जात आहे. ट्रम्प यांचे हे पाऊल जगाला विनाशाच्या दिशेने घेऊन जात आहे की काय, असा प्रश्न आता आंतरराष्ट्रीय विश्लेषक उपस्थित करत आहेत.



ही कारवाई एखाद्या चित्रपटाच्या दृश्यापेक्षा कमी नव्हती. समुद्रात तरंगणारा एक टँकर, त्याच्या वरती घिरट्या घालणारे एक हेलिकॉप्टर आणि दोरीचा वापर करून खाली उतरणारे अमेरिकन सैनिक. महत्त्वाचे म्हणजे, ही अमेरिकन कारवाई त्या भागात रशियन नौदल युद्धनौका आणि पाणबुड्या देखील उपस्थित असताना झाली. तथापि, जेव्हा अमेरिकन तटरक्षक दलाने टँकर ताब्यात घेतला तेव्हा जवळपास कोणतेही रशियन जहाज नव्हते. या कारवाईत ब्रिटनने अमेरिकेला पूर्ण पाठिंबा दिला. या कारवाईवर रशियाने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. रशियन सिनेटर आंद्रेई क्लिशास यांनी याला खोल समुद्रात उघड चाचेगिरी आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे थेट उल्लंघन म्हटले आहे. १९८२ च्या संयुक्त राष्ट्रांच्या समुद्र कायद्यावरील कराराचा हवाला देत, रशियाने म्हटले आहे की कोणत्याही देशाला दुसऱ्या देशाच्या रीतसर नोंदणीकृत जहाजावर बळाचा वापर करण्याचा अधिकार नाही. रशिया आता कसा प्रतिसाद देतो याकडे जगाचे लक्ष आहे. २४ तासांच्या आत दुसऱ्या मोठ्या कारवाईत, अमेरिकेने कॅरेबियन समुद्रात व्हेनेझुएलाचे तेल चीनला नेणारे आणखी एक तेल टँकर, एम/टी सोफिया, ताब्यात घेतले. यावरून ट्रम्प प्रशासनाचे तेल व्यापार आणि त्याच्या नियंत्रणाबाबत आक्रमक धोरण स्पष्ट होते.

ट्रम्प यांनी केवळ रशियाशी भांडण केले नाही तर व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांचे अपहरण करून चीनच्या हितसंबंधांना थेट हानी पोहोचवली आहे. दरम्यान, ट्रम्प यांचे जवळचे सहकारी सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी इराणबाबत एक अतिशय धोकादायक विधान केले आहे. ग्रॅहम यांनी उघडपणे धमकी दिली आहे की जर इराणने निदर्शकांना मारणे थांबवले नाही तर अध्यक्ष ट्रम्प त्यांचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचे आदेश देऊ शकतात.

डोनाल्ड ट्रम्प आता ग्रीनलँडवर कब्जा करण्याचे ध्येय ठेवून आहेत. हे साध्य करण्यासाठी त्यांनी युरोपीय देशांना आणि नाटोला स्पष्टपणे सांगितले आहे की अमेरिकेशिवाय नाटो अस्तित्वात आहे. जेव्हा फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या कारवाईवर टीका केली तेव्हा ट्रम्प यांनी त्यांची जाहीरपणे खिल्ली उडवली आणि राजनैतिक नियमांचे उल्लंघन केले.

ट्रम्प प्रशासन आपले संरक्षण बजेट १ ट्रिलियन डॉलर्सवरून १.५ ट्रिलियन डॉलर्स करण्याची तयारी करत आहे. तज्ञांना हे युद्धाची तयारी वाटते. त्याच वेळी, भारतासाठी अडचणी उद्भवू शकतात. जर भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवली तर अमेरिका त्यावर ५०० टक्क्यांपर्यंत शुल्क लादण्याचा विचार करत आहे.

## संपादकीय....

### जागतिक संघर्ष

अमेरिकन तटरक्षक दल आणि लष्कराने एका संयुक्त मोहिमेअंतर्गत उत्तर अटलांटिक महासागरातून 'मरीनेरा' या रशियन ध्वजांकित तेल टँकरला ताब्यात घेतले आहे. अमेरिकेच्या दाव्यानुसार, हा टँकर आंतरराष्ट्रीय निर्बंधांचे उल्लंघन करून व्हेनेझुएलाच्या तेलाची बेकायदेशीर वाहतूक करत होता. विशेष म्हणजे, या टँकरचे पूर्वीचे नाव 'बेला-१' असे होते आणि २०२४ मध्येच अमेरिकेने यावर निर्बंध लादले होते. कारवाई टाळण्यासाठी टँकरचे नाव बदलून तो पुन्हा सक्रिय करण्यात आला होता, मात्र अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनी तो शोधून काढला. जागतिक तणावात भर ट्रम्प यांच्या या आक्रमक कारवाईमुळे रशिया संतप्त होण्याची शक्यता असून, यामुळे दोन्ही अण्वस्त्रधारी देशांमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने थेट रशियन मालमत्ता जप्त करणे, हे जागतिक शांततेसाठी धोकादायक मानले जात आहे. ट्रम्प यांचे हे पाऊल जगाला विनाशाच्या दिशेने घेऊन जात आहे की काय, असा प्रश्न आता आंतरराष्ट्रीय विश्लेषक उपस्थित करत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत येताना युक्रेन युद्ध थांबवण्याचे आणि जगात शांतता प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, नवीन वर्ष सुरू होताच ट्रम्प प्रशासनाची पावले शांततेऐवजी जागतिक संघर्षाला खतपाणी घालणारी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे. एकीकडे युक्रेनमधील युद्ध अद्याप सुरू असताना आणि मध्य पूर्वेतील तणाव कायम असतानाच, आता अमेरिका आणि रशियामध्ये थेट संघर्षाची ठिणगी पडली आहे. उत्तर अटलांटिक महासागरात अमेरिकेने रशियाचा तेल टँकर जप्त केल्याने तिसऱ्या महायुद्धाच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. ही कारवाई एखाद्या चित्रपटाच्या दृश्यापेक्षा कमी नव्हती. समुद्रात तरंगणारा एक टँकर, त्याच्या वरती घिरट्या घालणारे एक हेलिकॉप्टर आणि दोरीचा वापर करून खाली उतरणारे अमेरिकन सैनिक. महत्त्वाचे म्हणजे, ही अमेरिकन कारवाई त्या भागात रशियन नौदल युद्धनौका आणि पाणबुड्या देखील उपस्थित असताना झाली. तथापि, जेव्हा अमेरिकन तटरक्षक दलाने टँकर ताब्यात घेतला तेव्हा जवळपास कोणतेही रशियन जहाज नव्हते. या कारवाईत ब्रिटनने अमेरिकेला पूर्ण पाठिंबा दिला. या कारवाईवर रशियाने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. रशियन सिनेटर आंद्रेई क्लिशास यांनी याला खोल समुद्रात उघड चाचेगिरी आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे थेट उल्लंघन म्हटले आहे.

## राज्य ग्रंथालय परिषदेची पहिली बैठक; ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य : मंत्री चंद्रकांत पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी केले. मंत्रालयात राज्य ग्रंथालय परिषदेच्या बैठकीस मंत्री पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त राम लिप्ते, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग उपसचिव तुषार महाजन, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अमोल मुत्याल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, ग्रंथालय संघ अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, ग्रंथालय संघ मराठवाडा विभागाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, पुणे विभागाचे अध्यक्ष सोपान पवार, कोकण विभागाचे अध्यक्ष दिलीप कोरे, डॉ. सिद्धी जगदाळे, डॉ. सुभाष चव्हाण, सुनील वायाळ व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, राज्य शासनाच्या निर्णयानुसार १६ वर्षांनंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली आहे. राज्य ग्रंथालय परिषद ही ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनास सल्ला देणारी प्रमुख परिषद आहे. ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार असल्याचे तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

बैठकीत ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सीएसआर निधी किंवा राजा राममोहन रॉय योजना यांच्या माध्यमातून मोबाईल वाचन व्हॅन खरेदी करून ती गावे, शाळा आणि दुर्गम भागांमध्ये नेऊन वाचन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाशी समन्वय साधण्याचे निश्चित करण्यात आले. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व ६ विभागीय ग्रंथालयांमध्ये फिरते ग्रंथालय सेवा देणे योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरु करणे, तसेच ई-लायब्ररी, ई- लायब्ररी युनिक डेटाबेस, फिरते वाचनालय आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक ग्रंथालयाचे नियतकालिक तीन वर्षानंतर तपासणी करण्यास मंजुरी देण्यात आली.

बैठकीत ग्रंथालय संचालनालयाच्या २००८-०९ ते २०२४-२५ या वर्षातील अहवालांना मंजुरी देण्यात आली.

## पत्रकार दिनानिमित्ताने पत्रकार मिलिंद जाधव सन्मानित

ठाणे/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्ताने भिवंडी तालुक्यातील पडघा ,समतानगर येथिल पत्रकार मिलिंद सुरेश जाधव यांना सन्मानित करण्यात आले आहे. मिलिंद जाधव हे भिवंडी तालुक्यातील समतानगर, पडघा या ग्रामीण भागात राहत असून ते महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा सहसचिव तथा भिवंडी तालुका सचिव म्हणून काम पाहत आहेत. त्यांचा सामाजिक तसेच विविध क्षेत्रांमध्ये नेहमीच सहभाग असतो. परिसरात विविध विषयाला हात घालून आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी वाचा फोडण्याचे काम सातत्याने केले आहे. ते लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. आपल्या ट्रस्टच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम आयोजित करीत असून प्रबोधन करीत असतात. एवढंच नव्हे तर, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे एक युवा पत्रकार म्हणून त्यांची ओळख आज इतरांच्या नजरेतून पाहायला मिळते. म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ , शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित साधून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष भगवान चंदे ,शहापूर उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे ,वासिंद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हुनदेलकर यांच्या हस्ते

५ जानेवारी २०२६ रोजी



शहापूर तालुक्यातील दहागाव येथील घोडविंदे फार्म हाऊस येथे पत्रकार मिलिंद जाधव यांना सन्मानित करण्यात आले आहे. तर यावेळी सर्वच स्तरातून पत्रकार मिलिंद जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## भाजपकडून बंडखोरांवर मोठी कारवाई; तब्बल २६ जणांचे सहा वर्षांसाठी निलंबन, मुंबईतील बड्या नेत्यांचाही समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होत असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. एकीकडे प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे राजकीय पक्षातील अंतर्गत विरोध आणि पक्षातील बंडखोरी हि उच्च पदस्थ नेत्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र आहे. अशातच या बंडखोरांवर मुंबई भाजपकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. भाजपने बंडखोरी (ठशलशश्रश्रळेप) करणाऱ्यांचं थेट निलंबन करत कारवाईचा बडगा उगारला आहे.

मुंबई महापालिकेत अपक्ष उमेदवारी करत बंडखोरी केलेल्यांचे पक्षश्रेष्ठींकडून निलंबन करण्यात आलं आहे. मुंबई भाजपकडून जवळ जवळ २६ जणांचे ६ वर्षांसाठी निलंबन करण्यात आल्याची माहिती आहे. महापालिका निवडणुकीत पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत हि निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या निर्देशानुसार कारवाई झाल्याची सूत्रांची माहिती आहे. यामध्ये माजी नगरसेविका आसावरी पाटील, नेहल शहा, जान्हवी राणे यांचे देखील निलंबन करण्यात आलं आहे. सोबतच, दिव्या ढोले, जयमुरगन नाडार, शोभा साळगावकर यांच्यावर देखील पक्षविरोधी कारवाया केल्याने निलंबनाची कुऱ्हाड चालवण्यात आली आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपकडून भाजपा युवा मोर्चाच्या मुंबई अध्यक्ष तेजिंदर सिंग तिवाना मैदानात उतरले आहे. मालाड प्रभाग क्रमांक ४७ मधून तेजिंदर सिंग तिवाना यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे. तेजिंदर सिंग तिवाना यांच्या प्रचारासाठी तमिळनाडू राज्यातील भाजप युवा खासदार अण्णा मलाई यांची उपस्थितीमध्ये प्रचार करण्यात आला. यावेळी खासदार अण्णा मलाईकडून भाजप उमेदवार तेजिंदर सिंग तिवाना यांना निवडून आणा, असे आव्हान दक्षिण भारतीय मतदारांना केले. मालाडमध्ये प्रभाग ४७ मध्ये भाजप,काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट असा त्रिकोणी लढत होत आहे.

## महापालिका निवडणुकीत पीपल्स रिपब्लिकन पार्टी महायुतीचा घटक पक्ष म्हणून लढत आहे : जयदीप कवाडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/ प्रतिनिधी :- पीपल्स रिपब्लिकन पार्टी महायुतीचा घटक पक्ष असून महापालिकेच्या निवडणुक रिंगणात उतरलो असून महायुतीकडून पक्षाला समाधानकारक जागा मिळाल्या आहेत. ज्या ठिकाणी महायुतीतील घटक पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवीत आहेत त्या महापालिकेत आम्ही स्वतंत्र लढत आहोत मुंबई महापालिकेसाठी दोन जागा उल्हासनगर महापालिका प्रभाग क्रमांक १८ मधील. अ.ब.क.ड. ४ जागा व ठाणे महापालिकेत विद्यमान दोन नगरसेवक आहेत. महायुती मधून पीपल्स रिपब्लिकन पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अध्यक्ष रामदास आठवले यांनी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना कार्याची संधी मिळावी यासाठी महायुतीबरोबर जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळ उपाध्यक्ष जयदीप कवाडे यांनी कळंब येथे आयोजित स्वागत सत्कार व पत्रकारांशी बोलताना सांगितले .

रिपब्लिकन ऐक्या याविषयी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील रिपब्लिकन पक्ष निर्माण व्हावा यासाठी सर्व गटांनी एकत्रित नव्हे तर सर्व गटाचे एका पक्षात विलीनीकरण व्हावे अशी आमची भूमिका आहे असे त्यांनी विचारलेला प्रश्नाला उत्तर देताना सांगितले यावेळी त्यांनी आम्ही वंचित निश्चितच नाहीत असे म्हणाले पीपल्स रिपब्लिकन पार्टी राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे हे महापालिका निवडणूक महायुती उमेदवाराच्या प्रचारार्थ लातूर येथील सभेस उपस्थित राहून पुढे अहिल्यानगर महापालिका निवडणूक प्रचार सभेसाठी जात असताना त्यांचा ७ जानेवारी रोजी कळंब पत्रकार भवन येथे सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता.



त्यांचे कळंब येथे आगमन झाल्यानंतर फटाके फोडून स्वागत करण्यात आले छत्रपती शिवाजी महाराज ,डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास त्यांनी पुष्पहार अर्पण केला व अभिवादन केले याप्रसंगी त्यांच्यासोबत पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष एन. डी. सोनकांबळे, पक्षाचे महाराष्ट्र संघटक कपिल लिंगायते, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनिस शेख यांची उपस्थिती होती. उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा स्वागत व सत्कार किरण जाधव, सलीम शेख, अनिल धावारे, बापू ईटकर यांनी केले .याप्रसंगी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज आयोजित जीवनदान महाकुंभ २०२६ कळंब येथील रक्तदान शिबिरात ८३ रक्तदात्यांचे रक्तदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि, जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीज धाम महाराष्ट्र यांच्या प्रेरणेने जीवनदान महाकुंभ ( रक्तदान ) २०२६ दिनांक ४ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ आयोजन करण्यात आले असून तुम्ही जगा दुसऱ्याला जगवा हा नरेंद्रचार्यजी महाराजांचा संदेश सदभक्तांना आहे दरवर्षीप्रमाणे पंधरा दिवस चालणाऱ्या महाकुंभा द्वारे विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचा उपक्रम संस्थान तर्फे राबविण्यात येत आहे यानुसार उपजिल्हा रुग्णालय कळंब येथे ७ जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, शिबिराचे उद्घाटन जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिवाजी आप्पा कापसे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी नगरसेवक अमर चाऊस, डिकसळ ग्राम




पंचायत सदस्य इम्रान मुल्ला, विकास कदम, सतीश आडसूळ यांची उपस्थिती होती , रक्तदात्यांना धाराशिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ब्लड बँकेच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले , ब्लड बँकेचे कर्मचारी व उपजिल्हा रुग्णालय कळंब स्टाफ यामध्ये डॉ. दीपमाला करंडे रक्तसंक्रमण अधिकारी, लक्ष्मीकांत मुंडे रक्तपेढी तंत्रज्ञ, निलाक्षी जानराव , दीप्ती बंगले, नामदेव मुंडे, नरसिंग ऑफिसर, स्वप्नील जाधव, गणेश साळुंखे जनसंपर्क अधिकारी, सतीश कांबळे रक्तपेढी परिचर ,रक्तदान प्रमाणपत्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, प्राचार्य जगदीश गवळी, पत्रकार माधवसिंग राजपूत, जयनारायण दरक, यांच्या हस्ते देण्यात आले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज शिष्यगण विठ्ठल काटे, कल्याण बोराडे, जीवन चव्हाण, राजेंद्र मुळीक, दत्तात्रय इंगोले, स्वप्निल खिंडकर, व्हंडे, रमेश शिंदे ,प्रदीप जाधवर, प्रमोद कुलकर्णी, अशोक त्रिमुखे ,अनिता चव्हाण, अनिता विभुते, सुहासिनी काळे, कोमल जाधवर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमात गरजवंत भक्तांना जयनारायण दरक यांच्या वतीने ब्लँकेट, व रक्तदात्यासाठी बिस्किट वाटप करण्यात आले.

## कळंब येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे, धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे बाळशास्त्री जांभेकर व पत्रकार दिनाचे औचित्य साधून कळंब तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवन कळंब येथे नगराध्यक्षा सुनंदाताई शिवाजी कापसे, नगरसेवक शितल चोंदे व कळंब तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर व शिवशंकर (बप्पा घोंगडे) यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच पत्रकारांना शुभेच्छा म्हणून मान्यवरांच्या हस्ते पेन बॉक्सचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला कळंब तालुका पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश टोणगे, अध्यक्ष अशोक शिंदे, पत्रकार अमर चोंदे, बालाजी अडसूळ, मंगेश यादव, अनिल गाडे, शिवप्रसाद बियाणी, शितल घोंगडे, ओमकार कुलकर्णी, दिपक माळी, परवेज मुल्ला आदी कळंब तालुक्यातील पत्रकार हजर होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दिल्लीत रंगणार अस्सल सोलापुरी हुरडा पार्टी आणि मराठमोळा संक्रात महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नवी दिल्ली, राजधानी दिल्लीत सध्या काढायच्या थंडीचा जोर वाढला असून धुक्याची चादर पसरली अशा वातावरणात दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे उप देण्यासाठी कष्टभाग आहे मार्ग स्थित नवीन महाराष्ट्रात सदनात अस्सल सोलापुरी हुर्डा पार्टी आणि मकर संक्रांतीच्या महोत्सव चे नऊ ते ११ जानेवारी या कालावधीत दुपारी ११ ते ९.३० या वेळेत आयोजन करण्यात आले असलेली माहिती युवाचे आयुक्त तथा सचिव श्रीमती आर .विमला यांनी दिली या हुरडा पार्टीसाठी ड्रीम फाउंडेशनच्या बसव संगम शेतकरी गटाला निमंत्रण आले असून सोलापुरातून पाच शेतकरी व सात महिला बुधवार दिनांक ७ जानेवारी रोजी सर्व होंडा साहित्य घेऊन रेल्वेने विमानाने जाणार असल्याचे होर्डा पार्टी समन्वयक बसव संगम शेतकरी गटाचे कार्याध्यक्ष काशिनाथ भतगुणकी व जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले यांनी पत्रकार परिषद माहिती दिली. महाराष्ट्रात साधन साधनात डिसेंबर महिन्यात पार पडलेल्या महाराष्ट्र खाद्य महोत्सवाला दिल्लीकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आता विशेषता हिवाळी हंगामाची मेजवानी म्हणून हुरडा पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे.

संक्रातीचा गोडवा आणि अस्सल सोलापुरी हुरड्याचा खमंग स्वाद.

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या महोत्सवात तिळ-गुळ आणि पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडवणार आहे यामध्ये अस्सल सोलापूर हुर्डा, शेंगा चटणी गावरान बोर ऊस डहाळे सेंद्रिय गुळ सोलापूर मका चिवडा स्पेशल प्रशांत शेव मसाला शेंगा डाळिंब गावरान पेरू कच्चे शेंगा आणि जेवण बनवण्यासाठी जिजाऊ महिला बचत गटातील महिला टीम विविध खाद्यपदार्थ बनवण्यासाठी जाणार आहेत दिल्लीत सोलापुरी ठेचा शेंगापुळी धपाटे चुलीवरची भाकरी बाजरी भाकरी डिलीट रोटी मसाला रोटी बाजार आमटी बेसन पिठलं पेंडपला रान भाजी काय संक्रांत स्पेशल तिळगुळ ज्वारी बाजरी उंदे पालक कडधान्य भाज्या बाजार आमटी मेजवानी देणार असल्याचे असेल सोलापुरी पावना



संचालिका असो संगीता भगून की यांनी सांगितले व शेतामध्ये ज्याप्रमाणे शेकोटीवर होडा भाजून आनंद साजरा केला जातो तसाच अनुभव येथे दिला जाणार आहे हुरड्या सोबत खमंग लसूण चटणी स्वीट कॉर्न शेंगदाणा कूट जवळ बूट साजूक तूप टाक चुलीवरचे वापरलेले पिठले भाकरी भरीत भाकरी बटाटेवडा भाजी सोबत असे बोर ओला हरभरा अशा अस्सल गावरान पदार्थांची रेलचेल इथे असणार आहे थंडी शेकोटीची ऊब आणि संगतीत महिपेल ओरडेच्या आस्वाद अशा दुग्धाक्षरा योग या निमित्ताने जुळवून येणार आहे याबरोबरच संक्रांत वाहनासाठी महिलांनी बसवलेली वीर वस्तू पिकासाठी उपलब्ध असणार आहे

शहर आणि गाव यांना जोडणारा हा भावनिक पूल दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अधिक जवळ येऊन जाणार आहे ९ ते ११ जानेवारी दरम्यान नवीन महाराष्ट्र सदन येथे होणाऱ्या या महोत्सवांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्राच्या आधारे त्यांचा आणि चवीचा आनंद घ्यावा असे आव्हान निवासी आयुक्त आर विमल यांनी गुंतवणूक निवासी आयुक्त सुशील गायकवाड यांनी केले आहे असं सोलापूर होरडा पार्टी साठी सोलापूर शेतकरी परमेश्वर भदगुणकी सतीश पाटील विजयकुमार कांबळे आणि राजमाता जिजाऊ बचत गटाची सौ कस्तुरी पाटील व राजश्री बगले सौ भारती बिराजदार सौ शमणा हिरापुरे आधी महिला जाणार आहेत एकूण पाच हजार लोकांना पुरेल इतके साहित्य व ३०० किलो होरडा सलग तीन दिवस मेजवानी असणार आहे विमानाने हुरडा घेऊन तीन शेतकरी जाणार व दिल्लीतील हुरडा पार्टीला९१ वर्षीय श्री गुरु शांत बसून की आपल्या बसव संगम शेतकरी गटातील हुरडा उत्पादक शेतकऱ्यांना व हुरडा चोल चोळणारे पन्नास वर्षे अनुभवी शेतकरी सोबत जाणार आहेत दिल्लीतील होंडा पाटील लोकांना पार्सल सुविधा उपलब्ध असून साठी उपलब्ध होणार आहे.

## भिमाकोरेगांव विजयस्तंभास पायी जाऊन आलेल्यांचा सन्मान करणे म्हणजे आमचे भाग्य : बलवान गोतसुर्वे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वळसंग :- वळसंग ता.दक्षिण सोलापूर येथील भिम अनुयायीनी भिमा कोरेगांव येथे शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी पायी जाऊन आल्यालांचा सन्मान सत्कार करण्याचे भाग्य आम्हाला मिळाल्याची भावना भाजप अनुसूचित जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे यांनी व्यक्त केली.

वळसंग रमाई नगर येथे मातोश्री रमाई आंबेडकर तरुण मंडळाच्या वतीने विजयस्तंभास मानवंदना देऊन आलेल्या भिम अनुयायींचा सन्मान पत्र देऊन सन्मान व सत्कार करण्यात आले. या प्रसंगी बलवान गोतसुर्वे बोलत होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मलकाप्पा कोडले,मल्लिनाथ ढब्बे,सुभेदार आनंद गायकवाड,शांतकुमार गायकवाड, दीपक गायकवाड,प्रेम वाघमारे व मंडळाचे पदाधिकारी व भिमअनुयायी मोठया संख्येने उपस्थिती होते.

पुढे बोलताना गोतसुर्वे यांनी १ जानेवारी १८१८ साली भिमा नदी काठी झालेल्या लढाईत त्यावेळच्या जुलमी अत्याचाराविरुद्ध बंड म्हणून सामाजिक समतेसाठी तत्कालीन महार सैनिकांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने लढून समतेसाठी झालेल्या लढाईत विजय मिळवला. या विजयाचे प्रतीक म्हणून भिमाकोरेगांव येथे विजयस्तंभ उभारण्यात आले. त्या विजयस्तंभास १जानेवारी १९२७ साली परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट देऊन प्रेरणा घेतली तेंव्हा पासून आजतागायत देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भिम अनुयायी विजयस्तंभास दर १ जानेवारीस मानवानंदना देऊन एक स्फूर्ती व प्रेरणा घेऊन येत असतात त्याचाच भाग म्हणून वळसंग मधून ३० भिमसैनिक क्रांती मशाल घेऊन पायी जाऊन विजयस्तंभास मानवंदना देऊन आले याचा सर्वांना सार्थ अभिमान असल्याची भावना गोतसुर्वे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सामाजिक कार्यकर्ते दिपक गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संयोजक शांतकुमार गायकवाड यांनी केले. यावेळी मोठया संख्येने महिला मंडळ व ग्रामस्थ व रमाई मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर शशिकांत हरिदास, दीपक इरकल, नंदकुमार देशपांडे, संतोष उपाध्ये यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दीपक इरकल ,शशिकांत हरिदास, नंदकुमार देशपांडे, संतोष उपाध्ये यांच्यासह अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या नऊ जणांची नियुक्ती जिल्हाधिकारी कडून करण्यात आली.

सुधारित ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अनुसार प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करावी अशी त्यात तरतूद आहे. त्यानुसार आपल्या जिल्हा जिल्हाधिकारी यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या सदस्यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अध्यक्ष सदस्य म्हणून नियुक्ती केले आहे ग्राहकांचे प्रश्न समस्या अडचणी





तातडीने सुटाव यासाठी ग्राहक संरक्षण कायद्याने हे व्यासपीठ उपलब्ध केले आहे यामध्ये नागरिकांना सातत्याने दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी सोडवण्याच्या जाव्यात असे अभिप्रेत आहे.

परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून शशिकांत हरिदास, दीपक इरकल, सो माधुरी परदेशी, नंदकुमार देशपांडे, शशिकांत नरोटे, अँड विजय कुलकर्णी, संतोष उपाध्ये, दत्तात्रय कुलकर्णी राजन घाडगे यांची तर जिल्हा पोलीस प्रमुख उपअधीक्षक परिवहन अधिकारी सहाय्यक आयुक्त अन्न औषध प्रशासन, जिल्हा माहिती अधिकारी अधीक्षक अभियंता महावितरण, अधीक्षक अभियंता दूरसंचार उपनिबंधक वैद्यमापन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा शल्यचिकेचालय जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, इत्यादी खात्याचे जिल्हास्तरीवर अधिकारी, शासकीय सदस्य म्हणून नियुक्त केलेले असतात. सदस्य सचिव मन जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय काम पाहतात.

निवडीबद्दल या निवडीबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायत प्रांताध्यक्ष बाळासाहेब आवटी, संघटन मंत्री संदीप जंगम, प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये यांनी अभिनंदन केले.

## पंढरपूर डाक विभागांमध्ये नवीन सहा शाखा डाक घर सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर डाक विभागांमध्ये पंढरपूर ,करमाळा, माढा, माळशिरस, व सांगोला तालुक्यातील६ ठिकाणी नवीन शाखा डागर कार्यालय सुरू करण्यात आल्याची माहिती पंढरपूर विभागाचे अधीक्षक डाकघर यांनी दिली.

करमाळा तालुक्यातील आळजापूर आणि हिरवे, व माढा तालुक्यातील गवळीवाडी, व पंढरपूर तालुक्यातील करोळे आणि माळशिरस तालुक्यातील मारकरवाडी तसेच सांगोला तालुक्यातील सोनलवाडी या ठिकाणच्या शाखा डाकघर कार्यालयाचा उद्घाटन समारंभ खासदार दहीशील मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी आमदार नारायण आबा पाटील आमदार उत्तमराव जानकर, संबंधित गावचे सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, तलाठी ग्रामसेवक, व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन समारंभ पार पडला यावेळी पंढरपूर डाक विभागाचे अध्यक्ष मुन्ना कुंभार, सह अधीक्षक एस एम पाटील, करमाळा डाक विभागाचे उपाध्यक्ष लक्ष्मण शेवाळे, जन तक्रार निवारण अधिकारी राजेश शर्मा उपविभागीय ढाक निरीक्षक योगेश शिंगारे, हे उपस्थित होते.

नवीन पोस्ट ऑफिस मंजूर झाल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेची सोय झाली असून पोस्ट ऑफिस च्या विविध योजना खूप कायदेशीर आहेत. पंढरपूर डाग विभागांमध्ये नव्याने सुरू होणाऱ्या शाखा डाकघर कार्यालयातून ग्रामस्थांनी डाक विभागाच्या विविध बचत योजना विविध विमा योजना आधार सेवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक सह पोस्ट ऑफिसच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आव्हान खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले. या कार्यक्रमास संबंधित गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते व गावात नव्याने सुरू असलेल्या पोस्ट ऑफिसमुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## युवकांनी शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करावे : अभिषेक जोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : युवक ऊर्जावान व संवेदनाशील असतो, त्याच्याकडे यशस्वी जीवनाची वाटचाल करण्याची तसेच ध्येय निश्चित करण्याची प्रवृत्ती असते म्हणून त्याने गांभीर्याने शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करावे असे प्रतिपादन अभिषेक जोजन यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने वागदरी येथे आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते, यावेळी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी बापूराव चव्हाण उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, आरोग्यविषयक जनजागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या क्षेत्रांत युवक सक्रिय भूमिका घेऊ शकतात. स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक चळवळीं च्या माध्यमातून युवक समाजातील दुर्बल घटकांपर्यंत पोहोचून शाश्वत विकासाला चालना देतात.

आर्थिक शाश्वततेच्या बाबतीत युवकांचे कौशल्य, नवोपक्रम आणि उद्योजकता महत्त्वाची ठरते. कौशल्याधारित शिक्षण, आधुनिक शेती, हरित उद्योग, स्टार्टअप्स आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून युवक रोजगारनिर्मिती करू शकतात. स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यार्थी परिषद, युवक संसद, सामाजिक चळवळी आणि डिजिटल माध्यमातून युवक विकासविषयक प्रश्न मांडू शकतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा ओंकार घिवारे यांनी केले सूत्रसंचलन समर्थ पवार यांनी केले आभार प्रा राजशेखर पवार यांनी मानले.

### वांग्मय मंडळाकडून आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

## पत्रकारांनी समाज परिवर्तनास गती देण्यासाठी विकासाचे प्रश्न वृत्तपत्रातून मांडावेत : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी दर्पण नावाचे वृत्तपत्र सुरू केले, त्यामुळे राजकीय तसेच सामाजिक जाणिवा प्रगल्भ झाल्या, आता याच विषयाचा धागा पकडून पत्रकारांनी वृत्तपत्रातून विकासाचे प्रश्न मांडावेत तरच समाज परिवर्तन जलद गतीने होईल असे प्रतिपादक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.





मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वांग्मय मंडळाच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, राजकीय क्षेत्रात घडणाऱ्या प्रसंगाला दृकश्राव्य प्रसार माध्यमे महत्त्व देत आहे. त्यामुळे विकासाचे प्रश्न बाजूला पडत आहेत. शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यवसाय, रस्ते, वीज, पाणी आदी विकासाचे प्रश्न मागे पडत आहेत. लोकसंख्या वाढत चालली आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनातील प्रश्न जटील होत आहेत. त्यास प्रसिद्धी देण्याची जबाबदारी पत्रकारांनी स्वीकारली पाहिजे.

प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले आभार प्रा ओंकार घिवारे यांनी मानले.

या कार्यक्रमास प्रा. हर्षदा गायकवाड, शितल फुटाणे, शिवकुमार मठदेवरु, लक्ष्मण लिगाडे, शितल टिंगरे उपस्थित होते.

## इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता सातवी) २६ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या .ीलशर्ीपिश.ळप आणि https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली.

शासनमान्य शाळांमधून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता चौथीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व सातवीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी २ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला असून विलंब, अतिविलंब आणि अति विशेष विलंब शुल्कासह २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे.

# अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्ष पदग्रहण व उपनगराध्यक्ष, स्वीकृत सदस्य निवड १२ जानेवारीला होणार

## उपनगराध्यक्ष निवडीतही राहणार भाजपचे वर्चस्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा अधिकृत पदगृहण सोहळा, विशेष सभा तसेच उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीचा कार्यक्रम येत्या १२ जानेवारी रोजी पार पडणार आहे. स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या दिवशी नगर परिषदेतील महत्त्वाच्या निवडी होणार आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या अक्कलकोट नगर परिषदेच्या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने घवघवीत यश संपादन केले आहे.

या निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले असून, नगर परिषदेत पक्षाचे वर्चस्व अधोरेखित झाले आहे. या निवडणुकीत मिलन कल्याणशेट्टी यांची थेट जनतेतून नगराध्यक्षपदी निवड झाली आहे.

एकूण २५ नगरसेवकांपैकी तब्बल २२ सदस्य भाजपचे निवडून आले असून, केवळ तीन जागा विरोधी गटाला मिळाल्या आहेत. भाजपकडे बहुसंख्य सदस्यसंख्या असल्याने नगर परिषदेतील निर्णय प्रक्रियेवर पक्षाचे वर्चस्व राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बहुमताच्या जोरावर भाजपला तीन स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार मिळणार आहे. त्यामुळे



नगर परिषदेत भाजपची संख्या आणखी वाढणार असून, प्रशासकीय आणि विकासकामांच्या दृष्टीने पक्षाला अधिक बळ मिळणार आहे.

दरम्यान, या होणाऱ्या विशेष सभेत मिलन कल्याणशेट्टी हे अधिकृतरित्या नगराध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. त्याच सभेत उपनगराध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया देखील पार पडणार असून, या पदावरही भाजपचाच उमेदवार निवडून येणार आहे.

एकूणच अक्कलकोट नगर परिषदेत भाजपचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले असून, आगामी काळात शहराच्या विकासकामांना वेग मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अक्कलकोटमध्ये आ. कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पत्रकार कमलाकर सोनकांबळे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट, प्रतिनिधी : अक्कलकोटमध्ये आ. कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पत्रकार दिनाच्या उचित्य साधून दैनिक यश सिद्धि न्यूज संपादक, पत्रकार कमलाकर सोनकांबळे याचे सत्कारकरून शुभेच्छा दिले.

पत्रकार दिनानिमित्त येथील भाजपा कार्यालयात अक्कलकोट तालुक्यातील पत्रकारांचा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते भेटवस्तू, बुके, शाल देऊन सत्कार करण्यात आला. भारतीय जनता पार्टी अक्कलकोटच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात कार्यसम्राट आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी अक्कलकोट नगरपालिकेचे नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मालिनाथ आळगी, चंद्रकांत दसले, अप्पू बिराजदार, राजू बंदीछोडे नागेश कलशेट्टी अपाशा पुजारी आदीसह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. ६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त लोकशाहीचा चौथा स्तंभअसलेल्या पत्रकार बांधवांशी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

## उगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूलला खासदार निधीतून डिजिटल पोडियम भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे अभ्यासू खासदार भास्करराव भगरे यांच्या खासदार निधीतून तालुक्यातील शाळांना डिजिटल पोडियमचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव या विद्यालयालाही आधुनिक डिजिटल पोडियम प्राप्त झाले.

हा कार्यक्रम गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी खासदार भास्करराव भगरे यांच्या नवीन भास्कर जन सुविधा कार्यालयाच्या प्रांगणात पार




पडला. या प्रसंगी जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने पोडियम स्वीकारण्यासाठी प्राचार्य कैलास गवळी, भालचंद्र सूर्यवंशी, राजाराम वाबळे, सचिन वाबळे, बापू आव्हाड, ज्ञानेश्वर मातेरे व अतुल पाटील हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या औचित्याने खासदार भास्करराव भगरे यांचा वाढदिवस असल्याने प्राचार्य कैलास गवळी यांनी त्यांना पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.नंतर हा डिजिटल पोडियम शाळेत आणल्यानंतर प्राचार्य गवळी सरांनी विद्यार्थ्यांना या पोडियमची माहिती दिली. हा अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानयुक्त डिजिटल पोडियम आहे. माननीय खासदार भगरे यांच्या निधीतून आपल्याला मिळालेली ही सुविधा अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे, असे ते म्हणाले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा देत चांगल्या वर्तनाचा संकल्प करण्याचे मार्गदर्शन केले.या प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक नंदाराम ढिकले, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. डिजिटल पोडियममुळे अध्यापन अधिक प्रभावी व सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा,केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे पार्कसाईटकरांना आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : प्रभाग क्रमांक १२३ चे भारतीय जनता पार्टी,शिवसेना आणि रिपब्लिकन पक्षाच्या महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल निर्मळे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची जाहिर सभा आमदार राम कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत विक्रोळी पार्कसाईट,वर्षा नगर याठिकाणी पार पडली.या सभेत रामदास आठवले यांनी प्रमुख अतिथी म्हणून नागरिकांना मार्गदर्शन करताना महायुतीच्या उमेदवारांना कमळ या चिन्हांवर मतदान करून प्रभाग क्रमांक १२३ चे महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन यावेळी केले. महायुतीच स्थिरता, विकास आणि सामाजिक न्यायाची हमी आहे, असा विश्वास यावेळी केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी या सभेला ओम राम कदम, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, कुमार जीत आठवले, चंद्रशेखर कांबळे तसेच माजी नगरसेवक हारून खान यांच्यासह महायुतीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने याठिकाणी या जाहिर सभेला उपस्थित होते.महायुतीच्या या जाहिर सभेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून याठिकाणी महायुतीचा विजय निश्चित आहे, असा ठाम विश्वास वाटतो, असे यावेळी केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

## आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकिसाठी रिपाईंच्या कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे : अविनाश मडिखांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आगामी होणाऱ्या जिल्हा परीषद व पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट तालुक्यातील राखीव असलेल्या जागेतून निवडणूक लढवण्यासाठी कार्यकर्ते इच्छुक असलेले निवडणुकीसाठी सज्ज राहावे असे आवाहन रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे.




अक्कलकोट तालुक्यातील जकापूर येथे रिपाइं शाखेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. येत्या दोन दिवसांत आचारसंहिता लागू होणार आहे. नगरपरिषद निवडणुकीत खाते उघडले असून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतही रिपाईचे खाते खोलण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आतापासून जोमाने कामाला लागावे असे आवाहन अविनाश मडिखांबे यांनी केले. जागा वाटपबाबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याशी रिपाईचे शिष्टमंडळ घेऊन चर्चा करण्यात येणार आहे. चर्चेअंती काही जागा सोडवून घेऊ असे मडिखांबे यांनी सांगितले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच आमसिध्द वंटे हे होते. या प्रसंगी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, ता.युवक चे अध्यक्ष अप्पा भालेराव, शहर अध्यक्ष अजय मुकणार, ता.सरचिटणीस राजु भगळे, तम्मा दसाडे, कार्याध्यक्ष अंबादास गायकवाड, उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, माजी सरपंच संतोष आळगी, प्रकाश दुपारगुडे, भरमण्णा गायकवाड, गंगाधर मोरे, शक्तीमान गायकवाड, सचिन बनसोडे, यमनप्पा शिंदे, सिध्दार्थ गायकवाड, कृष्णा धोडमनी, बसवराज गायकवाड, गोरखनाथ धोडमनी, उमेश शिवशरण, बाबुराव निरगुडे, रमेश धोडमनी, बसु बबलाद, लक्ष्मण गायकवाड, पुंडलिक गायकवाड, माजी सरपंच भिमशा पुजारी, हुचप्पा गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### युवा दिन व राष्ट्रीय मतदार दिनानिमित कायदेविषयक जनजागृती शिबीर व निबंध स्पर्धा संपन्न

# कायदा हा लोकशाहीचा कणा असून युवक हे कायद्याचे दूत आहेत : न्यायाधीश प्रशांत पेठकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : आजच्या युवकांच्या हाती उद्याच्या भारताचे भवितव्य असून हे युवक समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडू शकतात. कायदा हा लोकशाहीचा कणा असून आजच्या युवकांनी कायदे दूत म्हणून भूमिका बजावावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रशांत पेठकर यांनी केले.

युवा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर सचिव तथा न्यायाधीश प्रशांत पेठकर, लोक अभीरक्षक शिवकैलास झुरळे, सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सरोजिनी तमशेट्टी, पोलीस हेड कॉस्टेबल अंजली काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व संगमेश्वर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने**

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेत गायत्री मेट्रे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, द्वितीय क्रमांक अक्षता शिवशरण, तृतीय क्रमांक समीक्षा थोरा, उतेजनार्थ सानिया नायडू व कर्तव्या बालसराफ यांनी पटकविले. विजेत्यांना प्रशस्तीपत्र व पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. मतदान करून लोकशाही बळकट करा असे आवाहन राष्ट्रीय मतदार दिनाविषयी बोलताना ॲड. सरोजिनी तमशेट्टी यांनी केले.

युवकांनी सोशल मिडीयाचा वापर जागरुकतेने, जबाबदारीने व सुरक्षित मार्गाने करावे जेणेकरून डिजिटल अरेस्ट होणार नाही असे मत सायबर सुरक्षा या विषयावर बोलताना प्रांजली काळे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ ऋतुराज बुवा यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर हे तरुणांचे भान जपण्यासाठी व जबाबदार युवक घडण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. शिवकैलास झुरळे यांनी केले, सूत्रसंचालन बसवराज हगरगुंडगी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सेवेच्या कर्मचारी व संगमेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वृंदानी परिश्रम केले.

## महायुतीच्या उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);प्रभाग क्रमांक १२७ च्या भारतीय जनता पार्टी,शिवसेना आणि रिपब्लिकन पक्षाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची जाहिर सभा आमदार राम कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत भिमज्योत सहकार मित्र मंडळ,भीमनगर घाटकोपर पश्चिम याठिकाणी पार पडली.या सभेत रामदास आठवले यांनी प्रमुख अतिथी म्हणून नागरिकांना मार्गदर्शन करताना महायुतीच्या उमेदवारांना कमळ या चिन्हांवर मतदान करून प्रभाग क्रमांक १२७ च्या महायुतीच्या उमेदवार सौ.अलका गणेश भगत आणि



यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.महायुतीच स्थिरता,विकास आणि सामाजिक न्यायाची हमी आहे,असा विश्वास यावेळी केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला.या प्रसंगी या सभेला महायुतीचे नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने याठिकाणी या जाहिर सभेला उपस्थित होते.महायुतीच्या या जाहिर सभेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून याठिकाणी महायुतीचा विजय निश्चित आहे,असा ठाम विश्वास वाटतो,असे यावेळी केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.